लोकमत

'सायबर शिक्षा'तून सुरक्षित डिजिटल व्यवहाराचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

कळमेश्वर : वाढत्या ऑनलाइन फसवणुकीला आणि सायबर गुन्ह्यांना आळा घालून डिजिटलदृष्ट्या सुरक्षित समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने म्हसेपठार (ता. कळमेश्वर) ग्रामपंचायतीमध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत अधिकारी-कर्मचारी तसेच महिला बचत गटाच्या सदस्यांसाठी विशेष सायबर जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर येथील दीप्ती प्रसाद आणि श्रेया बोमेडवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी फिशिंग, यूपीआय फसवणूक, ओटीपी व पिन मागणारे फोन, बनावट सोशल मीडिया अकाउंट, आयडेंटिटी थेफ्ट, ऑनलाइन आर्थिक फसवणूक तसेच 'डिजिटल अरेस्ट' यांसारख्या सायबर गुन्ह्यांची माहिती सोप्या उदाहरणांतून देण्यात आली.

मोबाइल व संगणक सुरक्षित ठेवणे, मजबूत पासवर्ड वापरणे, संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे, तसेच शासकीय ऑनलाइन पोर्टलचा सुरक्षित वापर करण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने अधिकृत माध्यमातून



तक्रार करण्याची प्रक्रियाही समजावून सांगण्यात आली. महिला बचत गटाच्या सदस्यांनी सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. दैनंदिन डिजिटल व्यवहारांमध्ये कोणती खबरदारी घ्यावी, याबाबत त्यांना व्यावहारिक मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाला सरपंच प्रिया कुबाडे, उपसरपंच मिलिंद यावलकर, ग्रामपंचायत अधिकारी मंजूषा दळवी यांचे सहकार्य लाभले.

